दै. देशोन्नती दि. 28/02/25

# पोलिसांच्या गोळीबारात आरोपी जखमी

देशोन्नती वृत्तसंकलन

## झरी येथील खदान परिसरातून आरोपी ताब्यात

**नांदेड/सोनखेड :** शहरात खून, दरोडा, गोळीबाराची मालिका सुरूच असून पोलिसांनी आणखी एका आरोपीवर गोळीबार केल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी पहाटे झरी येथील खदान परिसरात घडली. यामध्ये आरोपींनेही पोलिसांच्या दिशेने गोळी झाडली. तर पोलिसांनी झाडलेली गोळी आरोपीच्या पायात घुसली असून पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

आरोपी अविनाश उर्फ भैय्यासाहेब मिराशे विरुद्ध अनेक गुन्हे दाखल आहेत. भैय्यासाहेब हा पोलिसांना गुंगारा देऊन फरारच होता. दरम्यान भैय्यासाहेब मिराशे हा त्याच्या साथीदारासह झरी येथील खदान परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. उपविभागीय पोलिस अधिकारी सुशिलकुमार नायक, ग्रामीण ठाण्याचे पोनि. ओमकांत चिंचोलकर, स्थागुशाचे पोनि. उदय खंडेराय, सपोनि साईनाथ पुयड, सोनखेडचे सपोनि पांडुरंग माने, पोउपनि आनंद बिचेवार यांनी घटनास्थळी जाऊन आरोपीस ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपी मिराशे याने पोलिसांच्या दिशेने गोळी झाडली. यावेळी पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल आरोपीच्या दिशेने दोन गोळया झाडल्या. त्यापैकी एक गोळी आरोपी अविनाश उर्फ भैय्यासाहेब मिराशे याच्या पायात घुसली. जखमी मिराशे यास पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.